# बोर्ड कृतिपत्रिका: मार्च 2022

## मराठी युवकभारती

**Time : 3 Hours** **Max. Marks: 80**

**कृतिपत्रिकेसाठी सूचना:**

(१) आकलन कृती व व्याकरण यांमधील आकृत्या किंवा चौकटी पेनाने अथवा पेन्सिलीने व्यवस्थित काढाव्यात.

(२) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

### विभाग १ – गद्य [२०]

**कृती १. (अ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **(८)**

(१) दृक्-श्राव्य दालनातील कारगिल युद्धाच्या फिल्ममधील थरार म्हणजे
→ (य) ..................
→ (र) .................. (२)

(२) कारगिल क्षेत्रातील विजयस्तंभा समोर लेखिकेने घेतलेल्या शपथेनुसार करावयाची कार्ये
→ (य) ..................
→ (र) .................. (२)

मृत्यू समोर दिसत असतानाही त्याच्या जबड्यात हात घालून मृत्यूलाच आव्हान देणारी बावीसतेवीस वर्षांची तेजोमय स्फुल्लिंग होती ती! ज्यांना आशीर्वाद द्यायचे, त्यांच्यासमोर नतमस्तक होऊन सलामी देणं किती कष्टप्रद आहे. ह्याची जाणीव झाली. थरथरत्या हातांनी, डबडबल्या डोळ्यांनी त्या स्मारकाला सलाम केला.

तेवढ्यात एक तरुण लष्करी अधिकारी तिथे आले. त्यांनी आम्हांला कारगिल-युद्धाची फिल्म बघायला तेथील दृक्-श्राव्य दालनात नेलं. तो सगळा थरार म्हणजे दुर्दम्य आशावाद, असामान्य कर्तृत्व, प्रखर राष्ट्रनिष्ठा आणि अदम्य साहस ह्या शब्दांना मूर्तपणे सार्थ करणारं कर्तृत्व होतं. सरतेशेवटी एका शहीद झालेल्या वीराच्या आईनं जे म्हटलं, ते ऐकून एक जबरदस्त चपराक बसल्यासारखं झालं. त्या म्हणाल्या, “जिस देश पर मैंने अपना बच्चा कुर्बान किया है, उस देश से थोडासा प्यार तो करो!” चाबकानं शंभर फटके मारले असते, तर ज्या वेदना झाल्या असत्या; त्यापेक्षाही कितीतरी पटीनं अधिक वेदना मनाला झाल्या. आणि त्या विव्हळ अवस्थेत विजयस्तंभासमोर शपथ घेतली-

“शिस्त, निष्ठा, समर्पण आणि त्याग ह्या माझ्या मध्यमवर्गीय शब्दकोशात सपकपणे वापरल्या जाणाऱ्या शब्दांना यथोचित न्याय देईन. केवळ शब्द नाहीत, तर तशी वृत्ती बनलेल्या सैन्यदलातील त्या वीरांचे भाट होऊन त्यांची कवनं गाईन आणि निदान पुढील पाच वर्षं नागरिकांना सोबत घेऊन ह्या भूमीवर येऊन सर्व वीरांना सलमी देईन.”

(३) स्वमत अभिव्यक्ती (४)
शहीद वीराच्या आईचे शब्द ऐकून लेखिकेवर झालेला परिणाम तुमच्या शब्दांत लिहा.

**किंवा**

सैनिकी जीवन व सामान्य नागरिकांचे जीवन यांची तुलना तुमच्या शब्दांत लिहा.

**(आ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **(८)**

(१) ज्यावर बसून पाखरे कुजबुजतात ती झाडे (२)

(य) ..................

(र) ..................

Target Publications

(२) लेखकाचा पहाट अनुभवण्याचा अनुभव (२)

(य) ..................

(र) ..................

सर्वांत आधी जाग येते ती आमच्या बागेतल्या पाखरांना. मी पहिला चहा करून घेऊन त्याचे घोट घेत घेत 'काय लिहावं?' याचा विचार करत काहीसा संभ्रमात असतो, त्यावेळी ही इवली पाखरं गुलमोहोराच्या घरट्यांतून, जॅक्रांडाच्या फांद्यांवरून हळूहळू डोळे किलकिले करून पाहतात. पहाटेच्या प्रकाशकिरणांना खुणावतात. आपपसांत हलकेच कुजबुजू लागतात. 'पहाट झालीय काय?' असं विचारू लागतात. खरं तर पहाटच त्यांना विचारत असते, की 'मी येऊ का तुम्हांला भेटायला?' पहाटेचं नि या इवल्या इवल्या पाखरांचंदेखील असंच काहीसं जवळकीचं नातं आहे. त्यांनी पंख फडफडल्याशिवाय पहाटदेखील आकाशात येत नाही. त्यांच्या पंखांची फडफड ऐकली, की पहाटेलादेखील राहावत नाही. मग ती आकाशात हलकेच पाऊल टाकते. इतकं हळुवार, की तुम्हांला त्याची गंधवार्तादेखील लागू नये! पहाट कशी होते, हे देखील पाहण्याजोगं आहे. पाहण्याजोगंच नाही तर अनुभवण्याजोगं आहे. मला तर तो नेहमीच एक अनोखा, लोभसवाणा, नाजूक, तरल अनुभव वाटला आहे. तुम्ही केव्हातरी असेच उठून बघा म्हणजे तुम्हांलाही त्यातला आल्हाद जाणवेल. त्यातली तरलता जाणवेल. त्यातली नजाकत जाणवेल.

हा आल्हाद व्यक्त करण्यासाठीच जणू आमच्या बागेतील जॅक्रांडावरची नि गुलमोहोरावरची पाखरं आपापसांत कुजबुजू लागतात. त्यांचा चिवचिवाट पहिल्यांदा किती मंद मंद असतो; पण जसजशी पहाट उजाडते, तसतसा तो वाढत जातो.

(३) स्वमत अभिव्यक्ती (४)

पहाट आणि पाखरे यांचे लेखकाने वर्णन केलेले नाते तुमच्या शब्दांत लिहा.

**किंवा**

'तुम्ही अनुभवलेली पहाट' तुमच्या शब्दांत वर्णन करा.

**(इ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. (४)**

(१) चौकटी पूर्ण करा. (१)

(य) अर्थयुक्त असणारे [ ]

(र) अनेक शब्दांच्या अर्थामधून साहित्यकृतीचा उलगडतो तो [ ] (१)

साहित्यकृती शब्दांनी बनलेली असते. शब्द अर्थयुक्त असतात. तो अर्थ एकपदरी अथवा अनेकपदरी असतो. प्रतिमा, प्रतीक हेही शब्दच असतात. त्यात एकाहून अधिक अर्थ असतात. भाषेतील रूपकप्रक्रियेने अर्थाचे विश्व व्यापक केलेले असते. शब्दांच्या साहाय्यानेच साहित्यकृतीत पात्रे, प्रसंग, वातावरण निर्माण केलेले असते. शब्दार्थजनित कल्पित विश्वाची निर्मिती साहित्यकृतीत होत असते. त्या विश्वाचे बाह्य जगाशी साधर्म्य किंवा वैधर्म्य असते. अनेक शब्दांच्या अर्थांमधून साहित्यकृतीचा आशय उलगडतो. मिथक, आदिबंध यांनी त्या आशयाला एक परिणाम दिलेले असते; तर शब्दांच्या अर्थांतून व्यक्त होणाऱ्या विचारप्रणालीने, जीवनविषयक भूमिकेने दुसरे परिमाण दिलेले असते. साहित्यकृतीत विविध व्यक्ती, समाजगट, व्यक्तींची मने, व्यक्ती आणि समाजगट यांच्यातील संबंध शब्दार्थांतून व्यक्त झालेले असतात. व्यक्तिंना, व्यक्तिसमूहांना सामाजिक संदर्भ असतो. त्या समाजगटाची, समाजाची विशिष्ट संस्कृती असते. माणसांच्या सर्वसाधारण व्यवहारात 'बोलणे' हा एक महत्त्वाचा व्यवहार असतो. ते बोलणे अगदी साधे, निर्देशात्मक, भावनात्मक, विचारप्रदर्शनात्मक, प्रतिक्रियात्मक, अंतर असे असू शकते.

-वसंत आबाजी डहाके

Target Publications

(२) खालील कृती करा. (२)

माणसाची व्यवहारात बोलण्याची वैशिष्ट्ये लिहा.
(य) .................. .
(र) .................. .

## विभाग २ – पद्य [१६]

**कृती २. (अ) खालील कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **(८)**

(१) कामक्रोधरूपी विंचू-इंगळी उतरवण्याचे उपाय (२)

(य) ......................... (र) .........................

(२) योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा. (२)

(य) सत्त्व उतारा देऊन, म्हणजे ...........
- (अ) जीवनसत्त्व देऊन.
- (आ) सत्त्वगुणांचा आश्रय घेऊन.
- (इ) सात्त्विक आहार देऊन.
- (ई) सत्त्वाचे महत्त्व सांगून.

(र) ‘विंचू चावला वृश्चिक चावला’, या शब्दांच्या द्विरुक्तीमुळे ...........
- (अ) भारूड उत्तम गाता येते.
- (आ) वेदनांचा असह्यपणा तीव्रतेने जाणवतो.
- (इ) भारुडाला अर्थ प्राप्त होतो.
- (ई) भारूड अधिक रंजक बनते.

विंचू चावला .............................
विंचू चावला वृश्चिक चावला।
कामक्रोध विंचू चावला।
तम घाम अंगासी आला ।। धृ ।।
पंचप्राण व्याकुळ झाला।
त्याने माझा प्राण चालिला।
सर्वांगाचा दाह झाला।। १ ।।
मनुष्य इंगळी अति दारुण।
मज नांगा मारिला तिनें।
सर्वांगी वेदना जाण।
त्या इंगळीची ।। २ ।।
ह्या विंचवाला उतारा।
तमोगुण मागे सारा।
सत्वगुण लावा अंगारा।
विंचू इंगळी उतरे झरझरा ।। ३ ।।
सत्त्व उतारा देऊन।
अवघा सारिला तमोगुण।
किंचित् राहिली फुणफुण।
शांत केली जनार्दनें ।। ४ ।।

(३) अभिव्यक्ती
सद्‌गुण अंगी बाणवण्यासाठी तुम्ही काय कराल ते लिहा. (४)

**(आ) खालील ओळींचा अर्थ लिहा.** **(४)**

सरी-वाफ्यात, कांदं लावते
बाई लावते
नाही कांदं ग, जीव लावते
बाई लावते

काळ्या आईला, हिरवं गोंदते
बाई गोंदते
रोज मातीत, मी ग नांदते
बाई नांदते

**(इ) खालीलपैकी कोणतीही एक कृती सोडवा.** **(४)**

**काव्यसौंदर्य**

अंगणात थांबलेल्या तुझ्या प्रेयस चांदण्याला
दार उघडून आत घेण्याचेही भान नाही ग तुला
बागेतली ती अल्लड जाईही पेंगुळतेय तुझी वाट पाहून पाहून
पण तू, तू मात्र झालीस अस्तित्वहीन प्राण हरवलेली पुतळी,
या ओळींतून सूचित होणारे भावसौंदर्य उलगडून दाखवा.

**किंवा**

**रसग्रहण**

सांगतो 'तात्पर्य' माझे सारख्या खोट्या दिशा:
"चालणारा पांगळा अन् पाहणारा आंधळा।"
माणसांच्या मध्यरात्री हिंडणारा सूर्य मी:
माझियासाठी न माझा पेटण्याचा सोहळा।
वरील ओळींचे रसग्रहण करा.

## विभाग ३ – साहित्यप्रकार : कथा **[१०]**

**कृती ३. खालील कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** (४)

**(अ)** (१) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(य) कथाकाराच्या प्रतिभाशक्तीचे कार्य लिहा. (१)

(र) कथानकाचे प्रयोजन लिहा. (१)

कथाकार त्याच्या प्रतिभाशक्तीने एखाद्या घटनेत वास्तवाचे व कल्पनेचे रंग भरतो. हे करताना तो निसर्ग, समाज, सांस्कृतिक संदर्भ, वातावरण इत्यादी घटकांचे साहाय्य घेतो. या सर्व घटकांच्या मदतीने घटनामालिकेचे कथात्म साहित्यात रूपांतर होते; म्हणून कथेत 'घटना' हा महत्त्वाचा भाग ठरतो. कथेत या मूळ घटनेलाच 'कथाबीज' असे म्हणतात.

कथानकात घटना, प्रसंग, पात्रांच्या कृती, स्वभाववैशिष्ट्ये, वातावरण इत्यादींचे तपशील हळुवारपणे उलगडत जातात. कथेत कथानकातील घटकांचे एकत्रीकरण केले जाते. या एकत्रीकरणातून कथेची मांडणी आकाराला येते. हे कथानक उलगडताना त्यातील प्रवाहीपणही जपले जाते. कथाकाराच्या मनात कथेच्या अनुषंगाने निर्माण झालेला भावाशय वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी कथन करणे हे कथानकाचे प्रयोजन असते.

पात्रचित्रण हा कथेचा महत्त्वपूर्ण घटक आहे. पात्रचित्रणातून कथेचा आशय पुढे पुढे जात राहतो. कथाकार एखाद्या पात्राची वृत्ती, कृती, उक्ती, भावना, विचार, कल्पना, संवेदना, जीवनसृष्टी, जीवनपद्धती इत्यादींच्या चित्रणातून त्या व्यक्तीचे शब्दरूप प्रतिमा तयार करत असतो. या शब्दरूप प्रतिमेला 'पात्र' असे म्हणतात. कथेतील पात्रांना वास्तवातील माणसांप्रमाणे रेखाटले जाते, म्हणून वाचकांची त्या पात्रांशी जवळीक साधली जाते. ही पात्रे कथाकाराची 'स्व' निर्मिती होते.

Target Publications

(२) कथाकार व्यक्तीची शब्दरूप प्रतिमा तयार करत असताना विचारात घेत असलेले घटक लिहा. (२)

**(आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **(६)**

(य) 'उत्तम डॉक्टर होण्यापेक्षा, उत्तम नर्स होणं कठीण आहे.' या विधानाबाबत तुमचे विचार लिहा.

(र) 'गढी' कथेच्या शीर्षकाची समर्पकता स्पष्ट करा.

(ल) 'शोध' कथेच्या नायिकेचे स्वभावचित्र तुमच्या शब्दांत रेखाटा.

(व) बोर्डिंगात शिकत असलेल्या व शिकून गेलेल्या विद्यार्थ्यांचे बापू गुरुजींबद्दल असलेले प्रेम तुमच्या शब्दांत लिहा.

## विभाग ४ – उपयोजित मराठी

**कृती ४.(अ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **(४)**

(१) मुलाखतीच्या प्रारंभाबाबत तुमचे मत लिहा.

(२) 'माहितीपत्रकाची भाषाशैली मनाची पकड घेणारी असावी' थोडक्यात स्पष्ट करा.

(३) अहवालाची आवश्यकता तुमच्या शब्दांत लिहा.

(४) माहितीपत्रकाचे वेगळेपण तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

**(आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **(१०)**

(१) खालील मुद्द्यांच्या आधारे 'मुलाखत ही कार्यकर्तृत्वाची ओळख असते.' हे विधान स्पष्ट करा.
मुलाखत म्हणजे ....... कार्यक्षेत्रांमधला ठसा ....... असाधारण व्यक्ती ........ आव्हाने ........ विशेष आदर.

(२) खालील मुद्द्यांच्या आधारे 'माहितीपत्रकाच्या रचनेची वैशिष्ट्ये' लिहा.
माहितीपत्रक म्हणजे .......... माहितीला प्राधान्य ......... उपयुक्तता ........... लिखित माध्यम ........... भाषाशैली.

(३) खालील मुद्द्यांच्या आधारे 'अहवाल लेखनाची वैशिष्ट्ये' विशद करा.
अहवाल म्हणजे ........... सुस्पष्टता .......... वस्तुनिष्ठता ........... विश्वसनीयता .......... विविध क्षेत्रांतील गरज.

(४) खालील मुद्द्यांच्या आधारे 'मुलाखतीच्या समारोपाचे महत्त्व' सांगा.
योग्य समारोप ......... वेळेचे भान ....... थांबणे म्हणजे कळसाध्याय .......... अनपेक्षित व समर्पक समारोप .......... यशस्विता ......... श्रोत्यांचा प्रतिसाद.

## विभाग ५ – व्याकरण व लेखन [२०]

**व्याकरण घटक व वाक्प्रचार.**

**कृती ५. (अ) सूचनेनुसार कृती करा.** **(१०)**

(१) (य) योग्य पर्याय निवडा. (१)

माणसं स्वत:चा छंद कसा विसरू शकतात?

वरील वाक्याचे विधानार्थी वाक्य ओळखून लिहा.

(१) माणसं स्वत:चा छंद नेहमी विसरतात.

(२) माणसं स्वत:चा छंद लक्षात ठेवतात.

(३) माणसं स्वत:चा छंद विसरू शकत नाहीत.

(४) माणसं स्वत:चा छंद किती लक्षात ठेवतात.

Target Publications

(र) सूचनेप्रमाणे सोडवा. (१)

जगात सर्व सुखी असा कोणी नाही.

(प्रश्नार्थी करा.)

(२) (य) योग्य पर्याय निवडा. (१)

'प्रतिक्षण' या सामासिक शब्दातील समासाचे नाव लिहा.

(१) अव्ययीभाव समास

(२) तत्पुरुष समास

(३) द्वंद्व समास

(४) बहुव्रीही समास

(र) 'दशदिशा' या सामासिक शब्दातील समासाचे नाव लिहा. (१)

(३) (य) योग्य पर्याय निवडा. (१)

'तबेल्यातून व्रात्य घोडा अचानक पसार झाला.'

या वाक्यातील प्रयोग ओळखून लिहा.

(१) कर्तरी प्रयोग

(२) कर्मणी प्रयोग

(३) भावे प्रयोग

(४) यांपैकी नाही.

(र) योग्य पर्याय निवडा. (१)

'कर्मणी प्रयोग' असलेले वाक्य शोधून लिहा.

(१) त्यांनी आम्हांला दृक्-श्राव्य दालनात नेले.

(२) भाग्यश्री जणू आमच्यात नव्हतीच.

(३) आम्ही धैर्याचा मुखवटाच चढवला होता.

(४) सैनिकाने शत्रूला सीमेवर रोखले.

(४) (य) योग्य पर्याय निवडा. (१)

दमडिचं तेल आणलं, सासूबाईंचं न्हाणं झालं

मामंजींची दाढी झाली, भावोजीची शेंडी झाली

वरील काव्यपंक्तींतील अलंकार ओळखून लिहा.

(१) अनन्वय

(२) अपन्हुती

(३) अर्थान्तरन्यास

(४) अतिशयोक्ती

(र) उपमान ओळखा. (१)

'सागरासारखा गंभीर सागरच!'

या वाक्यातील उपमान ओळखा.



Target Publications

(५) (य) 'विसर्ग देणे' या वाक्प्रचाराचा अर्थ खालील पर्यायांतून ओळखून लिहा. (१)

(१) अनुस्वार देणे.
(२) सोडून देणे.
(३) सावध असणे.
(४) जागृत असणे.

(र) 'विसर्ग देणे' या वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा. (१)

**(आ) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे २०० ते २५० शब्दांत निबंध लिहा. (१०)**

(१) मी पाहिलेला अविस्मरणीय सामना
(२) माझे आवडते शिक्षक
(३) मी शाळेची घंटा बोलतेय
(४) सूर्य नाही उगवला तर .....
(५) आजच्या स्त्रीचे समाजातील स्थान

Target Publications